# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

**कालमर्यादा : दिनांक ०८/०७/२०११.**

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-४/प्रयोगशाळा परिचर/२०११/ ५३२८ दिनांक : 30 JUN 2011

प्रति,

मा. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी.
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड.
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/कराड/कोल्हापूर/सोलापूर/मिरज/अवसरी.
प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव.
प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे.
प्राचार्य, म.रा. इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅने. अँड केट. टेक्नॉ., पुणे.
उपसचिव, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.

**विषय : प्रयोगशाळा परिचर हे पद पदोन्नतीने भरणेबाबत..**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्थांमधील प्रयोगशाळा परिचराची (वेतन श्रेणी रुपये ५२००-२०२००/ व ग्रेड वेतन रुपये १९००/-) पदे पदोन्नतीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

प्रयोगशाळा परिचर पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार सदर पदासाठी इयत्ता ०७ वी उत्तीर्ण व प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

सबब आपल्या संस्थेतील / कार्यालयातील जे चतुर्थ श्रेणी कर्मचारी इयत्ता ७ वी उत्तीर्ण असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक ०८ जुलै, २०११ पर्यंत या कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | वेतन श्रेणी (रुपये) | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

तसेच आपल्या संस्थेतील / कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचा-याची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.

( डी. एन. शिंगाडे ),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : ह्या कार्यालयातील श्री. एस. बी. शिंदे, प्रोग्रॅमर यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता :
त्यांना सूचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.
(२) ह्या कार्यालयातील सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

*C:\Users\PMD\Documents\Promotion-1.doc./47*